महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# जाहीर सूचना

सन २०२६-२०२७ करीता कोपा-२० तसेच आय.टी.आय वीजतंत्री (Electrician) ट्रेड ४० पदे व तारतंत्री (Wireman) ट्रेड ४० पदे, NCVT उत्तीर्ण झालेल्या (१०+२ या बंधातील) उमेदवारांकडुन प्रशिक्षणार्थी (Apprenticeship) असे एकुण १०० पदाकरीता म.रा.वि.वि.कं. मर्या संवसु मंडळ करीता (बीड व अंबाजोगाई विभागाकरीता) **दि.०८.०१.२०२६ ते दि. ०९.०१.२०२६** या कालावधीमध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**टिप : (सदर प्रक्रिया ही बीड जिल्ह्यातील उमेदवारांसाठी मर्यादित आहे.)**

**शैक्षणीक पात्रता:**

१. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उतीर्ण असणे आवश्यक आहे.

२. राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) (१०+२ या बंधातील) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री (Electrician) / तारतंत्री (Wireman) या ट्रेडमध्ये उर्तीण असणे आवश्यक आहे.

**अटी व शर्ती:**

१. सदर उमेदवार हा बीड जिल्ह्यातील रहिवासी असावा.

२. शिकाऊ उमेदवारांचे वय किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.

३. **दि.०८.०१.२०२६** ते **दि.०९.०१.२०२६** या कालावधीमध्ये **सकाळी ११:०० ते दु.०४:००** या वेळेत अर्ज सर्व शैक्षणीक कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह (इयत्ता १० वी चे गुणपत्रक व सनद, आय.टी.आय गुणपत्रक व सनद, जात प्रमाणपत्र, आधार कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, Apprenticeship Registration प्रत, (पासपोर्ट साईज फोटो सह) प्रत्यक्ष मंडळ कार्यालय बीड येथे सादर करण्यात यावेत.

४. उमेदवाराने Apprenticeship Portal वर **www.apprenticeshipindia.gov.in** या वेबसाईटवर, आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करुन योग्य रितीने अपलोड करणे आवश्यक असुन Portal वर Online Registration असणे अनिवार्य आहे.

५. उमेदवाराची निवड ही आय. टी. आय मधील प्राप्त एकुण गुणांच्या टक्केवारी नुसार करण्यात येईल.

६. प्रशिक्षणार्थी उमेदवारांची भरती ही केंद्र शासनाच्या (Apprenticeship) आरक्षणविषयक धोरणानुसार करण्यांत येईल.

७. अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांची यादी **दि.२०.०१.२०२६** रोजी मंडल स्तरावर प्रकाशीत करण्यात येईल. प्रकाशीत करण्यात आलेल्या शिकाऊ उमेदवार निवड यादीवर, कोणत्या उमेदवाराची हरकत असेल तर त्यांनी दिनांक **दि.२१.०१.२०२६** व **दि.२२.०१.२०२६** रोजी **सांयकाळी** ०६.०० वाजेपर्यंत लेखी हरकत अर्ज मंडल कार्यालय, बीड येथे सादर करावेत. त्यानंतर अखेरची यादी प्रसारित करण्यात येईल. तदनंतर कोणताही अक्षेप स्विकारला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

८. भरती प्रक्रियेत अवश्यकता भासल्यास कोणताही बदल करण्याचे किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकारांस राहतील व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

९. सदर भरती प्रक्रिये करीता बीड येथे येण्यासाठी किंवा परत जाण्यासाठी कोणताही प्रवास व दैनिक भत्ता मिळणार नाही.

१०. महावितरण कंपनी कर्मचाऱ्याच्या पाल्यास शिकाऊ उमेदवारी करीता अर्ज करता येईल.

११. **कामाचे स्वरुप:** प्रशिक्षणार्थी म्हाणून महावितरण मधील तंत्रज्ञ / यंत्रचालक या पदाची सर्व कामे.

इच्छुक उमेदवारांनी सर्व शैक्षणिक कागदपत्रांसह वरील कालावधीत अधीक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या., विद्युत भवन जालना रोड, कार्यालय मंडळ, बीड येथे संपर्क साधावा.

**सही/-**
**अधीक्षक अभियंता**
**मंडल कार्यालय बीड**

**PRO LTR No. 161 Dt. 30.12.2025**